वाचले :

१)क्षेत्रिय अधिकारी, "अ" क्षेत्रिय कार्यालय यांचेकडील पत्र क्र. अक्षेका/कावि/१/६७७ /२०१९ दि. ३/६/२०१९

२)मा. महापौर यांनी दि.२४/६/२०१९ रोजी मा. आयुक्त, पदाधिकारी, नगरसदस्य, अधिकारी यांचे समवेत घेतलेल्या बैठकीतील निर्णय.

३)मा. आयुक्त, पिंपरी चिंचवड मनपा यांचा दि. /७/२०१९ रोजीचा मान्य प्रस्ताव.

---

पिंपरी चिंचवड महानगरपालिका
भूमि आणि जिंदगी विभाग
क्र. भूजि/९/कावि/ /२०१९
दि. /७ /२०१९

विषय : ज्ञानज्योती सावित्रीबाई फुले स्मारक, पिंपरी इमारतीचा ताबा "अ" क्षेत्रिय कार्यालयास देणेबाबत...

आदेश,

वाचले क्र. २ अन्वये मा. महापौर यांनी दि. २४/६/२०१९ रोजी स्थायी समिती सभागृहामध्ये ज्ञान ज्योती सावित्रीबाई फुले स्मारक, पिंपरी या इमारतीबाबत बैठक आयोजित केलेली होती. सदर बैठकीमध्ये ज्ञानज्योती सावित्रीबाई फुले स्मारक इमारतीमधील लायब्ररी विकासाचे काम तात्काळ मनपामार्फत हाती घेण्यात येईल असा निर्णय घेणेत आलेला आहे. स्मारकातील दोन दालनांमध्ये सावित्रीबाई फुले व महात्मा फुले यांच्या जीवनावर आधारीत दृक श्राव्य प्रदर्शनी विकसित करणेकरीता सल्लागार नेमुन कामकाज सुरु करण्याबाबत निर्णय घेणेत आलेला आहे. उर्वरीत ठिकाणी कार्यरत असलेली कार्यालये ५ महिन्यांच्या कालावधीत अन्यत्र स्थलांतरित करुन तेथे अभ्यासिका, कौशल्य वृध्दीचे उपक्रम इ. राबविणेबाबतची कार्यवाही करणेत येईल असा निर्णय घेणेत आलेला आहे.

वाचले क्र. १ अन्वये " अ" क्षेत्रिय अधिकारी यांनी सदर इमारतीमध्ये नियोजित आराखड्यानुसार लायब्ररी चालू करण्यासाठी इमारतीचा ताबा क्षेत्रिय कार्यालयास मिळणेबाबत कळविलेले आहे.

सबब, मी, आयुक्त, पिंपरी चिंचवड मनपा उपरोक्त वाचले क्र. १ ते २ च्या अनुषंगाने ज्ञानज्योती सावित्रीबाई फुले स्मारक इमारतीचा ताबा "अ" क्षेत्रिय कार्यालयास देण्यास मान्यता देत आहे.

(श्रावण हर्डीकर)
आयुक्त
पिंपरी चिंचवड महानगरपालिका,
पिंपरी -१८

प्रत : १)मा.महापौर, पिंपरी चिंचवड मनपा

२)मा.आयुक्त कक्ष.

३)क्षेत्रिय अधिकारी – "अ" क्षेत्रिय कार्यालय

४)कार्यकारी अधिकारी – स्थापत्य "अ" क्षेत्रिय कार्यालय

५)संबंधित सर्व्हेअर श्री. बांबळे – सदर इमारतीचा ताबा संबंधित विभागास वेळेत देण्याबाबत त्वरीत कार्यवाही करणेत यावी.

६)संगणक ऑपरेटर – सदर आदेश मनपा संकेत स्थळावर प्रसिध्द करणेत यावा.